सकाळ

# निवारा उभारणीत 'रवळनाथ'चे योगदान मोलाचे

## सुधाकर खोराटे; आजऱ्यात ज्येष्ठ सभासद, यशवंत पाल्यांचा गौरव

**आजरा, ता. २६ :** मध्यमवर्गीय नोकरदारांना सहज सुलभ अर्थसहाय्य उपलब्ध करून निवारा उभारणीच्या कार्यात रवळनाथ संस्थेने मोलाचे योगदान दिले आहे, असे गौरवोद्‌गार गटविकास अधिकारी सुधाकर खोराटे यांनी काढले.

श्री रवळनाथ को - ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे तालुक्यातील ७५ वर्षे पूर्ण झालेले सभासद, निवृत्त सभासद व सभासदांच्या यशवंत पाल्यांचा गौरव सोहळा झाला. गटविकास अधिकारी श्री. खोराटे यांनी मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी बसवराज गुरव प्रमुख उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. श्री. गुरव म्हणाले, अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांपैकी निवाऱ्याची गरज भागविण्याबरोबरच विविध उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी कृतीतून जोपासणाऱ्या रवळनाथ हौसिंग सोसायटीची कामगिरी देशात आदर्शवत आहे.



आजरा : ॲड. बाळकृष्ण घोरपडे यांचा सत्कार करताना सुधाकर खोराटे. उपस्थित बसवराज गुरव, एम. एल. चौगुले आदी.

श्री. चौगुले म्हणाले, सभासद, ठेवीदार, कर्जदार व ग्राहकांचा विश्वास आणि संचालक कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे संस्थेची चौफेर प्रगती झाली आहे. सिद्धी पाटील, अल्फिया शेख, श्रुती येसणे, आर्यन वंजारे, वसुंधरा पाटील, श्रुती संकपाळ, अक्षय मतवाडकर, निवृत्त सभासद अरुण मुळे, पंच्याहत्तरी पूर्ण केलेले ॲड. बी. बी. घोरपडे यांचा सत्कार झाला. संचालक प्राचार्य आर. एस. निळपणकर, माजी संचालक प्रा. किरण प्रधान, प्रा. जनार्दन दळवी, सल्लागार डॉ. शिवशंकर उपासे, प्रा. नवनाथ शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, शाखाधिकारी बाळकृष्ण गवळी आदी उपस्थित होते. आजरा शाखेचे अध्यक्ष प्रा. विनय आजगेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सल्लागर नूरजहाँ सोलापुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. राजीव टोपले यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
27/08/2022 Page No. 5